# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २०/०४/२०१०**

आज मंगळवार दि. २०/०४/२०१० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. ०८/०४/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ३) | जंगम लक्ष्मण गणपत | विरोधी पक्षनेता |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १२) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १३) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १४) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १५) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १८) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २६) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३६) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३८) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३९) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४०) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४१) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ४२) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४३) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४७) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४८) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४९) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५०) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५१) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५२) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५३) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५५) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५६) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५७) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५८) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५९) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६०) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६१) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६३) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६४) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६५) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६६) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६९) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| २) | नलावडे दिनेश दगडू | सभापती, स्थायी समिती |
| ३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ६) | सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | सदस्या |
| ७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ८) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ९) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| १०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ११) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| १२) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. २०/०४/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. ०८/०४/२०१० रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होत आहे. ११ वाजून ५० मिनीटे झालेली आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, प्रश्नोत्तराच्या तासाच्या आधी मिरा भाईंदरच्या या सभागृहातील विरोधी पक्षनेते श्री. लक्ष्मण जंगम यांनी मालाड इथे चिंचपोकळी इथली मारूतीची मुर्ती तिकडून चोरून वसई समुद्रामध्ये फेकून दिली आहे. त्याबद्दल.....

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल हा विषय या सभागृहाचा नाही. तुम्ही खाली बसा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

श्री. आमप्रकाश अग्रवाल यांना १५ दिवसांकरीता सस्पेंड करण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल, आपको १५ दिन के लिए सस्पेंड किया है। आप बाहर निकलो ।

**रामनारायण दुबे :-**

आप सबको सस्पेंड किजीए।

**नरेंद्र मेहता :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी आपली भावना मांडलेली आहे. तुम्हाला वाटते हा सभागृहाचा अपमान आहे. तर सर्वांची भावना ती आहे. आपण सर्वांना सस्पेंड करा. आम्ही बाहेर जातो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आम्हाला फक्त आमची भावना व्यक्त करू द्या. आम्ही जे बोलतो ते सभागृहाने ऐकून घ्यायला पाहिजे. मा. महापौर साहेब, या सभागृहाचे जबाबदार व्यक्ती, या शहराचे जबाबदार व्यक्ती, त्यांनी ते कृत्य केलेले आहे. त्याबद्दल आम्हाला पाच मिनिटे बोलायला द्या.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, आपण खाली बसावे. बीजेपी च्या सर्व सन्मा. सदस्यांना निलंबीत करण्याचे मी आदेश देत आहे. सचिवांनी त्यांची नावे वाचून दाखवावीत. आणि १५ मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

निलंबीत करण्याचे कारणही सांगा.

**मा. महापौर :-**

आपण या सभागृहाचा कायदा सुव्यवस्था बिघडल्यामुळे, शहरात कायदा सुव्यवस्था बिघडल्यामुळे परिस्थिती कधीही वाईट होऊ शकते. ती होऊ नये. त्याचप्रमाणे आपण सभागृहाचा वेळसुध्दा गमावलेला आहे. त्या निमित्ताने आपल्याला १५ मिनिटासाठी निलंबीत करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल, श्री. नरेंद्र मेहता, श्री. शरद पाटील, श्री. रामनारायण दुबे, श्रीम. कल्पना म्हात्रे, श्रीम. वर्षा भानुशाली, श्रीम. सिसिलीया बावीघर, श्रीम. मिरादेवी यादव, श्रीम. स्नेहा पांडे, श्री. श्रीप्रकाश जिलेदार, श्री. मदन उदितनारायण सिंह व श्री. संजय पांगे मा. महापौरांच्या आदेशानुसार मी नावे वाचन केली,

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपल्या वृत्तपत्रामध्ये हनुमान मुर्ती संदर्भामध्ये जवळ-जवळ बऱ्याचशा अशा बातम्या आलेल्या आहेत. आम्ही या सभागृहाचा निषेध करतो आणि बाहेर जातो.

**जयंत पाटील :-**

पान नं. ६७

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी सांगावे की, कोणत्या कायद्याखाली आम्हाला निलंबीत केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही नोटीस वाचा. रेकॉर्डिंग होऊ द्या. मग आम्ही जातो. नोटीस सचिवांनी बनवली.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, सदरची बाब ही कोर्ट मॅटर असल्यामुळे मा. उच्च न्यायालयामध्ये चालू आहे. त्याची तपासणी करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**जयंत पाटील :-**

या ठरावामध्ये जी माहिती दिलेली आहे, त्यानुसार इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीचा डी.सी. रूल्सशी काही संबंध नाही. आपल्या डी.सी रूल्सची एनए करण्यासाठी इस्टेट इन्व्हेस्टमेंटच्या सर्टीफिकेटची आपल्याला गरज

नाही. असे असताना त्यांचे चालायचे ते चालू द्या. आपल्या डी.सी. रूलमध्ये तो नियम नाही. मग तुम्ही इस्टेट इन्व्हेस्टमेंटच्या सर्टीफिकेटसाठी का थांबता? त्याच्यामुळे आपल्या बजेटवर निश्चित परिणाम होईल. कारण आपले प्लान पास होणार नाहीत, शहराचा विकास होणार नाही. नुकसान होईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

शासनाकडे गेलो नाही. दोन दिवसात चर्चा करून निर्णय....

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आमचा आरोप काय आहे तो सांगा.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, दरवेळी सभागृहात आपण माझ्यावर आरोप .......

**जयंत पाटील :-**

दि. २०/०२/२००९ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. २०/०२/२००९ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. २०/०२/२००९ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०२, आरक्षण क्र. ३२६ या जागेत ट्रक टर्मिनल सुरु करणे तसेच सदर जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या शिबिराकरीता जागा व रुम उपलब्ध करुन देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, गुन्हा बताइए। बता नही सकते तो ऐसा निर्णय लेने की...

**भगवती शर्मा :-**

आरक्षण क्र. ३२६ मधील महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या जागेवर ट्रक टर्मिनल सुरु करण्यास तसेच सदर जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकरीता दोन रुम बांधून भाड्याने देण्यास सदर कामी अपेक्षित रु. १४,७४,५००/- एवढ्या खर्चास देखील ही सभा मान्यता देत आहे. सदर ट्रक टर्मिनल करीता आवश्यक सुविधा महागनरपालिकेमार्फत पुरविण्यात याव्यात. वाहतुक शाखेकडून शहरातील अनधिकृतपणे उभी करण्यात आलेली वाहने उचलण्यास एम.आय.डी.सी. येथील जागा देण्यात आलेली असून सदर ठिकाणी आवश्यक ती व्यवस्था करण्यात यावी. शहरात त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार जागा ठरवून पार्कींग व नो पार्कींगचे फलक बसवून आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ )

**निर्मला सावळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

आरक्षण क्र. ३२६ या जागेत ट्रक टर्मिनल सुरु करणे तसेच सदर जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या शिबिराकरीता जागा व रुम उपलब्ध करुन देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०२ :-**

आरक्षण क्र. ३२६ मधील महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या जागेवर ट्रक टर्मिनल सुरु करण्यास तसेच सदर जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकरीता दोन रुम बांधून भाड्याने देण्यास सदर कामी अपेक्षित रु. १४,७४,५००/- एवढ्या खर्चास देखील ही सभा मान्यता देत आहे. सदर ट्रक टर्मिनल करीता आवश्यक सुविधा महागनरपालिकेमार्फत पुरविण्यात याव्यात. वाहतुक शाखेकडून शहरातील अनधिकृतपणे उभी करण्यात आलेली वाहने उचलण्यास एम.आय.डी.सी. येथील जागा देण्यात आलेली असून सदर ठिकाणी आवश्यक ती व्यवस्था करण्यात यावी. शहरात त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार जागा ठरवून पार्कींग व नो पार्कींगचे फलक बसवून आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०३, सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणे बाबतचे प्रारुप उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**जयंत पाटील :-**

सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणे बाबतचे प्रारुप उपविधी सर्व सन्मानीय नगरसेवकांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह अर्तंभाव करुन प्रारुप उपविधी बाबत नगारीकांकडून सुचना व हरकती मागविणेस मा. महासभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**लक्ष्मण जंगमः-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सदरचा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला सुचना मांडायची आहे.

**मा. महापौर :-**

श्री. मिलन म्हात्रे, आपली सुचना घेण्यात येणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आज विषय आहे. आम्हाला टीडीआर वर चर्चा करू द्या. तुम्ही दरवेळी आमच्यावर आरोप करता.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला यांच्या वादात पडायचे नाही. ही मिटींग चालवायची पध्दत नाही. आत्ता हा दुसरा ठराव सचिवांनी वाचला का? मग मिटिंग कशाला बोलवता?

**(सभागृहात गोंधळ )**

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमची सुचना मांडा.

**(सभागृहात गोंधळ )**

**प्रकरण क्र. ०३ :-**

सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणे बाबतचे प्रारुप उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०३ :-**

सांसर्गिक साथीच्या व स्थानिक रोगाच्या लागणीची सुचना देणे बाबतचे प्रारुप उपविधी सर्व सन्मानीय नगरसेवकांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह अर्तंभाव करुन प्रारुप उपविधी बाबत नगारीकांकडून सुचना व हरकती मागविणेस मा. महासभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. डॉ. राजेंद्र जैन व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या अंदाजे ११ लक्ष आहे. तसेच एकूण ११० खाजगी रुग्णालये आहेत. या रुग्णालयात नेहमी विविध प्रकारच्या आजारांचे रुग्ण ॲडमिट असतात. तसेच अशा सर्व

खाजगी रुग्णालयांनी विविध महत्वाचे आजार जसे की, डेंग्यू, लेप्टो, काविळ, मेलेरिया, कॉलरा, गॅस्ट्रो व इतर आजारांच्या रुग्णांबाबत महानगरपालिका आरोग्य विभागास करणे बंधनकारक आवश्यक आहे. परंतु बऱ्याच वेळेस अशा रुग्णांची माहिती समन्वयाच्या आभावामुळे प्राप्त होत नाही. तथापी वेळेत माहिती न मिळाल्याने रुग्ण राहत असलेल्या भागात आरोग्य विभागामार्फत वेळेत सर्वेक्षण होत नाही. तसेच त्यामुळे संशयित रुग्ण शोधून उपचार करणे शक्य होत नाही व पर्यायाने साथ पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे मी आपणांस विनंती करतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील आरोग्य विभागात खाजगी रुग्णालयांकडून माहिती वेळेत प्राप्त करण्याकरीता फोन रेकॉर्डींग सिस्टीम आपण त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावी, जेणेकरुन सर्व खाजगी रुग्णालयांमधून वेळेवर आरोग्य विभागास माहिती मिळेल व पुढील आवश्यक ती कार्यवाही केली जाईल व पर्यायाने संशयीत रुग्णांची आरोग्य तपासणी होउन उपचार केले जातील व नागरीकांचे आरोग्य सुरक्षित राहील.

तरी याबाबत कृपया आपण आराग्य विभागास योग्य ते निर्देश द्यावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०४, जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन प्रारुप उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**जयंत पाटील :-**

जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन प्रारुप उपविधी २०१० उपविधीत सर्व सन्मानीय नगरसेवकांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह अंतर्भाव करुन प्रारुप उपविधी बाबत नागरीकांच्या सुचना व हरकती मागविणेस मा. महासभा मंजूरी देत आहे असा ठराव करण्यात येत आहे.

**एस. ए. खान :-**

मेरा अनुमोदन है।

**मिलन म्हात्रे :-**

बजेटच्या मिटींगमध्येपण तुम्ही हेच केले. हे असे प्रकार चालायचे नाहीत.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०४ :-**

जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन प्रारुप उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

जुन्या वापरलेल्या वस्तुच्या व्यवसायाचे नियमन प्रारुप उपविधी २०१० उपविधीत सर्व सन्मानीय नगरसेवकांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह अंतर्भाव करुन प्रारुप उपविधी बाबत नागरीकांच्या सुचना व हरकती मागविणेस मा. महासभा मंजूरी देत आहे असा ठराव करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०५, वाफ, पाणी, विद्युतशक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्तीचा वापर करणारे व कामाची जागा उभारणी प्रारुप उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

वाफ, पाणी, विद्युतशक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्तीचा वापर करणारे व कामाची जागा उभारणी सोबत जोडल्याप्रमाणे प्रारुप उपविधी तयार करण्यात आलेली आहे.

सदर प्रारुप उपविधीस सदस्यांच्या सुचनांसह ही सभा मान्यता देत आहे. सदर उपविधीबाबत नियमानुसार हरकती, सुचना मागवून पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन अंतिम मान्यतेकरीता सदर विषय मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**नयना म्हात्रे :-**

राष्ट्रवादी कॉंग्रेसची युती झाल्यामुळे ठराव तुमच्या बाजूनेच मंजुर होणार आहे. पण एखाद्या नगरसेवकाला काही सुचना मांडायची आहे, ती तरी तुम्ही ऐकून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. ०२ प्रशासनातर्फे जो प्रस्ताव आलेला आहे, त्याच्यामध्ये दोन रुम आणि मोकळया जागेच्या उल्लेख केलेला आहे. त्या दोन रुमचे...

**शरद पाटीलः-**

मा. महापौर साहेब, आमचे आरोप आम्हाला एकदा सांगा.

**जयंत पाटीलः-**

मा. महापौर साहेब, मला आपल्याला एक विनंती करायची आहे. मला एका महत्वाच्या विषयासंबंधी बोलायचे आहे. या शहरामध्ये बऱ्याचशा ठिकाणी रोगराई पसरलेली आहे. इकडे अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो आहे आणि त्या विशिष्ट रोगांना मा. महापौर निधीतून निधी देण्यासंबंधी नियम आहेत. मला मनापासून असे वाटले की, या महापौर निधीसाठी आपण थोडासा हातभार लावावा. म्हणून माझा उर्वरीत जो अडीज वर्षांचा कालावधी आहे, त्या कालावधीतील माझे मानधन मी मा. महापौर निधीत जमा करतो. आणि त्याचप्रमाणे डॉ. प्रेम, ती आमची दोघांची पत्र आहेत. ते अधिकार आम्ही आपल्याला दिलेले आहेत.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आमच्यावर काय आरोप आहेत, आम्ही काय वक्तव्य केले ते सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आज टी.डी.आर. चा विषय आहे. तूम्ही दरवेळी आरोप करता आणि आज चर्चा करु देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र.०२ मध्ये आपण दोन रुम आणि मोकळया जागेचा उल्लेख केलेला आहे. परंतु या जागेचे क्षेत्रफळ किंवा दोन रुमचे स्क्वेअर फुट किती त्याचा उल्लेख प्रशासनाकडून केलेला नाही मोकळया जागेची लांबी-रुंदी याचाही उल्लेख केलेला नाही. तसेच आर.टी. ओ. कडून वार्षिक किंवा मासिक भाडे प्रशासन किती घेणार, याचासुध्दा उल्लेख केलेला नाही. माझा प्रशासनावर असा ठाम आरोप आहे कि, हा जो गोषवारा दिला आहे. एक तर हेतु पुरस्परपणे याच्यामध्ये कंन्फ्यूजन ठेवले गेले आहे. कारण आर्थिक बाब आहे. याच्यामध्ये आम्ही सर्व नगरसेवकांनी मिळून किती रक्कमेला मंजूरी द्यावी आणि किती एरीयाला द्यावी? उद्या अख्खे आरक्षण आर.टी.ओ. गिळंकृत करून बसेल की, तुम्ही आम्हाला या ठरावाद्वारे परमिशन दिलेली आहे. कारण या ठरावामध्ये कुठेही लांबी-रुंदी काही दिलेली नाही. उद्या आर.टी.ओ. ने अख्खे आरक्षण खाल्ले, जसे आपल्या फायर ब्रिगेडच्या वर दोन रुम पोलिसांच्या गुप्तचर विभागाने ताब्यात घेतल्या होत्या. बरेच वर्षे त्या बिन भाडयाने वापरल्या. आणि अजूनही त्यांचे भाडे मिळालेले नाही. महापालिकेचेही या गोषवाऱ्याद्वारे आर्थिक नुकसान होणार आहे. प्रशासनाचा कोणता अधिकारी याला जबाबदार आहे? मा. महापौरांनी याचा जरा खुलासा करावा आणि जर घाईघाईने प्रत्येक वेळेला ठराव वाचला गेला, त्या ठरावामध्ये आमची सुचना नाही. आमचा याला आदेश आहे की, तुम्ही करा. हे दरवेळेला ठराव खालच्या खाली वाचतात. आम्ही सदस्य या सभागृहामध्ये मतदान करत असतो. आम्ही उद्या अडचणीत येऊ. माझ्याबरोबर बाकीचे नगरसेवकपण येतील. मागच्या वेळेला विषयपत्रिकेवर नसताना सुध्दा नाटय गृहाचा विषय या लोकांनी आपल्या विषयपत्रिकेवर आणण्याचा प्रयत्न केला आणि ठरावाद्वारे मंजूर करायचा केला. जी जागा आपल्या ताब्यात नाही, त्याबद्दल आपण विचार विनिमय कसा काय करु शकतो?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, ट्रक टर्मिनलच्या जागेवर २० x ३० ची जागा द्यायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आपण आमची नोटीस वाचा. आम्ही जातो.

**मा. आयुक्त :-**

२० x ३० ची जागा, दोन रुम फक्त आर.टी.ओ.च्या रजिस्ट्रेशनसाठी द्यायचे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

पण तुम्ही याचा उल्लेख का केला नाही? गोषवाऱ्यामध्ये सर्व्हे नंबर नाही, हिस्सा नंबर नाही, एरीया नाही, क्षेत्रफळ नाही.

**जुबेर इनामदार :-**

आणि देतानाचा किती वर्षाकरीता देणार आहात त्याचा उल्लेख करा.

**मिलन म्हात्रे :-**

आणि आर.टी.ओ. ला किती देणार आहात? उद्या त्यांनी कॅम्पसाठी अख्खे आरक्षण श्री. भगवती शर्मा यांनी ठराव केला त्यानूसार गिळंकृत केले तर?

**मा. आयुक्त :-**

२० x ३० चे दोन रूम बांधुन द्यायचे.

**मिलन म्हात्रे :-**

ते गोषवाऱ्यामध्ये आलेले नाही. आम्ही २० x ३० ला परमिशन देऊ. आम्ही ३५ x ३२ ला देणार नाही. हे एरीया झाला. तुमचे भाडे कोणी ठरवले आहे? महापालिकेच्या मालमत्तेचे भाडे ठरवायचा अधिकार मा. महासभेला आहे. तुमच्या गोषवाऱ्यानूसार तुम्हाला अपेक्षित भाडयाची रक्कम किती हे गोषवाऱ्यात पाहिजे होते. त्याच्यात वाढ आणि कमी, आम्ही करु शकलो असतो.

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

इतर रेटनूसार प्रतिवर्षी १० टक्के वाढ त्याच्यात होते. ती वाढ तुम्ही त्याच्यात इन्क्लूड करणार आहात का?

**मा. आयुक्त :-**

चौदा हजार सातशे पंचेचाळीस

**मिलन म्हात्रेः-**

हे तुम्ही जे म्हणता हे आर.टी.ओ. ला मान्य आहे असे गोषवाऱ्यामध्ये कुठे आहे? तुम्ही ठरवले आहे.

**मा. आयुक्त :-**

अजून इमारत बांधायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आर.टी.ओ. ला तुमचे मान्य पाहीजे ना. मला तुमची जागा भाडयाने घ्यायची आहे. मला ते मान्य पाहिजे. मोकळया एरीयाची जागा किती? शिबिराकरीता आरक्षणापैकी जागा किती?

**मा. आयुक्त :-**

आम्हाला दोन रुम द्या म्हणून आर.टी.ओ चे पत्र आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मोकळी जागा?

**(सभागृहात गोंधळ)**

**स्नेहा पांडेः-**

सबको सस्पेंड क्यो किया? आरोप बताइए।

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, हा जो तुमचा गोषवारा आला आहे, हा आर्थिक बाबींचा आहे.

**नगरसचिव :-**

प्रशासनाचा गोषवारा आहे. मा. आयुक्तांकडून आला.

**मिलन म्हात्रे :-**

तो तुमच्या हस्ते आला, म्हणजे तुम्ही मम बोलतात.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेबांनी आमच्या चुका आणि आरोप सांगावे. आम्ही असे काय केले की, आपण निलंबन केले? आपण पाच महिलांना निलंबीत करता. आपल्याकडे आरोपसुध्दा नाहीत. आपण चुका सांगा, आम्ही माफी मागतो.

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी या सभागृहामध्ये आपल्या शहराबद्दल विषय नसताना या ठिकाणी विषय निर्माण केला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, विधानसभेमध्ये विषय झाला.

**मा. महापौर :-**

शांततेचा भंग झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आरोपपत्र वाचा. आम्ही जातो.

**प्रकरण क्र. ०५ :-**

वाफ, पाणी, विद्युतशक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्तीचा वापर करणारे व कामाची जागा उभारणी प्रारुप उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

वाफ, पाणी, विद्युतशक्ती किंवा अन्य यांत्रिक शक्तीचा वापर करणारे व कामाची जागा उभारणी सोबत जोडल्याप्रमाणे प्रारुप उपविधी तयार करण्यात आलेली आहे.

सदर प्रारुप उपविधीस सदस्यांच्या सुचनांसह ही सभा मान्यता देत आहे. सदर उपविधीबाबत नियमानुसार हरकती, सुचना मागवून पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन अंतिम मान्यतेकरीता सदर विषय मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०६, मिरा भाईंदर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनीयम) उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनीयम) सोबत जोडल्याप्रमाणे प्रारुप उपविधी तयार करण्यात आलेली आहे.

सदर प्रारुप उपविधीस सदस्यांच्या सुचनांसह ही सभा मान्यता देत आहे. सदर उपविधीबाबत नियमानुसार हरकती, सुचना मागवून पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन अंतिम मान्यतेकरीता सदर विषय पुन्हा मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

प्रकरण क्र. ०६ आणि ०७ माझ्या सुचनांसह ठराव मंजुर करून घ्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, नोटीस वाचा.

**मा. महापौर :-**

तुम्ही चुक कबुल करता का?

**प्रकरण क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनीयम) उपविधी २०१० करीता मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनीयम) सोबत जोडल्याप्रमाणे प्रारुप उपविधी तयार करण्यात आलेली आहे.

सदर प्रारुप उपविधीस सदस्यांच्या सुचनांसह ही सभा मान्यता देत आहे. सदर उपविधीबाबत नियमानुसार हरकती, सुचना मागवून पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन अंतिम मान्यतेकरीता सदर विषय पुन्हा मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. सलिम दाउद शेख व अनुमोदक श्री. हरीश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

१) फेरीवाल्याचे मतदार यादीत नाव असावे.
२) फेरीवाल्याचे वास्तव्य मिरा भाईंदर शहरातील असावे व त्याला मिरा भाईंदर शहरातील वास्तव्याचा दाखला असावा.
३) स्थानिक नगरसेवकांचे ओळखपत्र / शिफारस पत्र असावे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी खालील सुचना मांडली**

सदर समितीमध्ये स्थानिक नगरसेवक त्या त्या वॉर्डमधील त्या समितीवर घेण्यात यावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०७, घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन प्रारुप उपविधी करीता मान्यता मिळणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन सोबत जोडल्याप्रमाणे प्रारुप उपविधी तयार करण्यात आलेली आहे. सदर प्रारुप उपविधीस सदस्यांच्या सुचनांसह ही सभा मान्यता देत आहे. सदर उपविधीबाबत नियमानुसार हरकती, सुचना मागवून पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन अंतिम मान्यतेकरीता सदर विषय पुन्हा मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन प्रारुप उपविधी करीता मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन सोबत जोडल्याप्रमाणे प्रारुप उपविधी तयार करण्यात आलेली आहे. सदर प्रारुप उपविधीस सदस्यांच्या सुचनांसह ही सभा मान्यता देत आहे. सदर उपविधीबाबत नियमानुसार हरकती, सुचना मागवून पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन अंतिम मान्यतेकरीता सदर विषय पुन्हा मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी खालील सुचना मांडली**

वरील उपविधीमध्ये कोणत्याही कायद्याची पायमल्ली झाली किंवा कोणताही कचरा वेगळा करुन व रस्त्यावर जाळणे वरील सर्व बाबी करता सेनेटरी इन्स्पेक्टर जबाबदार राहतील व त्यात ह्यावर सर्वस्वी लक्ष त्याने द्यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिलेल्या टि. डी. आर. बाबत उच्चस्तरीय चौकशी नेमणेस मंजूरी देणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिलेल्या टी.डी.आर. बाबत उच्चस्तरीय चौकशी नेमणे या विषयाबाबत प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. सन्मा. सदस्यांना गोषवारा न दिल्याने सदर विषयी संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही. करिता सदर विषय पुढे घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिलेल्या टि. डी. आर. बाबत उच्चस्तरीय चौकशी नेमणेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिलेल्या टी.डी.आर. बाबत उच्चस्तरीय चौकशी नेमणे या विषयाबाबत प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. सन्मा. सदस्यांना गोषवारा न दिल्याने सदर विषयी संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही. करिता सदर विषय पुढे घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. ०२ वर आरटीओने आपल्याला एक पत्र पाठवलेले आहे. ते आत्ता मी वाचले. त्याच्यात त्यांची मागणी कुठेही किती बाय किती ते नाही. आपल्या गोषवाऱ्यामध्ये त्या पत्राचा रेफरन्स

नंबर नाही. तुम्ही जो रेट ठरवाल तो आरटीओ ला मान्य असेल का? त्याकरिता माझी सुचना अशी आहे की,गव्हर्नमेंटच्या रेडी रेकनर नुसार तुम्हाला जे भाडे ठरवायचे आहे, म्हणजे जागेवरचे बांधकाम, बांधकामाचे भाडे निराळे, जागेचे भाडे निराळे. कारण या अगोदरच्या मिटींगमध्ये आपण मोकळ्या जागेकरिता भाडे ठरवलेले आहे. त्यांना जी जागा, समजा एकूण १० एकरचे आरक्षण आहे. तर त्यातील त्यांना १ एकर हवे आहे. तर तुमचा लेआऊट प्लान काढून त्या आरक्षणामध्ये त्यांना रस्तासुध्दा मिळाला पाहिजे. आपलेही आरक्षण सेफ राहिले पाहिजे. दोघांचे काम व्यवस्थित झाले पाहिजे. या दृष्टीकोनातून रेडी रेकनरनुसार जे भाडे ठरेल, ते त्या ठरावामध्ये तुम्ही नोंद करून घ्या. त्यांची साईझ काय पाहिजे? त्या अधिकाऱ्यांना बोलवा. नाहीतर तुम्ही १० x १० द्याल, ते १५ x १५ मागतील. त्याच्यानंतर जो काही मातीभराव झाला आहे, त्याच्या रॉयल्टी संदर्भात आपल्याला जिल्हाधिकाऱ्यांकडून माफी मिळते. ती तुम्ही करून घेतली, तर सरकारी कार्यालयातून सरकारी कार्यालयात. आत्ता तुम्हाला एक नवीन वाट सांगतो. आत्ता मा. हायकोर्टाने कल्याण कोर्टाला, भिवंडी कोर्टाला सेशन कोर्टची मान्यता दिली. परंतु सेशन कोर्टची बिल्डींग अनधिकृत आहे असे मा. हायकोर्टानेच ठरवले आहे. उद्या ह्या मारामाऱ्या नको म्हणून त्याच्याखाली जो मातीभराव झाला आहे, त्याच्या रॉयल्टीसुध्दा, तुम्ही गोषवाऱ्यामध्ये नोंद करून घ्या. व्हॅल्युएशन संदर्भात भाडे करार तुम्ही किती काळासाठी करणार? तो उल्लेख नाही. पाच वर्षासाठी देणार आहात? वीस वर्षासाठी देणार आहात? दहा वर्षासाठी देणार आहात? किती वर्षासाठी देणार आहात? कारण गोषवाऱ्यामध्ये कुठेही उल्लेख नाही.

**मा. आयुक्त :-**

तीन वर्षासाठी आहे. अगोदर रूम बांधून घेतो. रूम बांधल्यानंतर भाडे ठरवायला परत मा. महासभेपुढे येतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आज घ्या. आमचा या ठरावाला विरोध नाही.

**मा. आयुक्त :-**

अटीशर्ती आणि भाडे घेऊन परत मा. महासभेची मंजुरी घेऊ.

**मिलन म्हात्रे :-**

काही गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

आत्ता फक्त रूम बांधायची मंजुरी घेऊ.

**मिलन म्हात्रे :-**

रेडी रेकनर आम्ही ठरवत नाही. आणि करारनामा किती वर्षाचा? तीन वर्षाचा असेल ना?

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेपुढे आणणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिवांना मी सुचना दिलेली त्या ठरावाचे वाचन करायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

दोन रूम बांधून झाल्यानंतर मा. महासभेपुढे विषय आणणार आहे. भाडे करारनाम्यासाठी परत विषय आणतो.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता जो ठराव पास केला त्याच्यात या गोष्टी तुम्ही इन्क्लुड करुन घ्या.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, प्रकरण क्र.०६ आणि ०७ माझी सुचना आहे. त्या सुचनेसह ठराव मंजुर करायचा आहे.

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**नगरसचिव :-**

राष्ट्रगितासाठी जागेवर उभे राहायचे आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी. २.२० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**